**CCE PF**
**CCE PR**

ಕರ್ನಾಟಕ ಪ್ರೌಢ ಶಿಕ್ಷಣ ಪರೀಕ್ಷಾ ಮಂಡಳಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು – 560 003

**KARNATAKA SECONDARY EDUCATION EXAMINATION BOARD, MALLESWARAM, BANGALORE – 560 003**

ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಪರೀಕ್ಷೆ, ಮಾರ್ಚ್/ಏಪ್ರಿಲ್, 2017

**S. S. L. C. EXAMINATION, MARCH/APRIL, 2017**

ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು

**MODEL ANSWERS**

ದಿನಾಂಕ : 30. 03. 2017 ] ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M**

Date : 30. 03. 2017 ] **Code No. : 08-M**

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

## Subject : First Language — MARATHI

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**

**( ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ + ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Private Fresh + Private Repeater )**

[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 125

[ Max. Marks : 125

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| | **विभाग - A** | |
| | **( गद्य, पद्य पाठ्यांशावर आधारित )** | |
| I. | प्रत्येकी एक वाक्यातील उत्तरे : ( बरोबर उत्तरास एक मार्क द्या ) : 16 × 1 = 16 | |
| 1. | ज्ञान उत्सुकता | 1 |
| 2. | तेरावे ( 13 वे ) शतक | 1 |
| 3. | कायदेमंत्री | 1 |
| 4. | ( 6 महिने ) सहा महिने | 1 |
| 5. | माझ्या पोराला कामात यश दे. तुला नारळ देईन. | 1 |
| 6. | डॉ० श्रीराम लागू | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 7. | शंकराचार्यांनी | 1 |
| 8. | नेत्रदानाचा | 1 |
| 9. | मुकुंदराज | 1 |
| 10. | भीमक | 1 |
| 11. | स्त्रियानी रचलेली सर्वसामान्य लोकांच्या भावना असणारी गाणी | 1 |
| 12. | वसंत | 1 |
| 13. | 12 रुपयाला ( बारा रुपयाला ) | 1 |
| 14. | देवाच्या विरहाने आर्त झालेली | 1 |
| 15. | प्रल्हाद केशव अत्रे | 1 |
| 16. | 1988 | 1 |
| II. | तीन-चार वाक्यातोल उत्तरे ( मुद्दे ) $13 \times 2 = 26$ | |
| 17. | विद्येचे शस्त्र धारण करणारी शीलवान व्यक्ति एकाचे रक्षण करील. शील नसेल तर विद्येच्या शस्त्राने घात करील. विद्या तलवारी सारखी आहे. शिकल्या सवरल्या लोकांच्याकडे कोणाला कसे फसवावे याचा युक्तीवाद असतो. अडाणी माणूस फसवू शकत नाही. | 2 |
| 18. | **संदर्भ –** पाठाचे नाव – नोकर ? छे, मालक<br>लेखक – चि. वि. जोशी.<br>लेखकाच्या पत्नीने स्वयंपाकीन काकूना म्हटले आहे. | 1 |
| | **स्पष्टीकरण –** काकू काकड आरतीहून वेळाने येतात. व निःसंकोचपणे मैनाला माझ्यासाठी चहा ठेवला नाही का असे म्हणतात. त्यावेळो लेखकाच्या पत्नीने वरील वाक्य म्हटले आहे. | 1 |
| 19. | घरातील कटकटी वाढत होत्या. कधी शेतातील कामे खोळबून राहत तर कधी चूल बंद पडत. आठ दिवसा पासून घरातील घुसपूस वाढली होती. वाटणीचा घाळ सहा महिने सुरु होता. दोघे भाऊ आखाड्यात उतरल्याप्रमाणे एकमेकाकडे पाहत. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 20. | **संत ज्ञानेश्वर –** ( 1275 - 1296 ) | |
| | ज्ञानेश्वर विठ्ठलपंत कुलकर्णी. महान तत्वज्ञ संतकवी. नाथ संप्रदायी. भागवत ( वारकरी ) संप्रदायाचे संस्थापक. 18 व्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली. 21 व्या वर्षी संजीवन समाधी घेतली. | 1 |
| | **साहित्य –** अमृतानुभव; चांगदेव पासष्टी; ज्ञानेश्वरी. | 1 |
| | ओवी काव्य प्रकार प्रसिद्धीस आणला. | |
| 21. | अगाऊ सूचना न देता येतात. फराळाच्या डब्यावर राजरोस हल्ला करतात. बाबांच्या पेटयातून विडयाचे जुडगे पळवतात. निर्लज्जपणे वागतात. कित्येक दिवस ठाण मांडून जायचे नाव काढत नाहीत. | 2 |
| 22. | स्वतःचे दुःख लपवून ठेवून <u>तांब्या भर पाण्याचा विसाव्याची</u> अपेक्षा करतात. या | 1 |
| | दुःखात सुख शोधण्यासाठो आपल्याला कोणीतरी पाठी असाव ( बंधू भगिनो ). कोणीतरी पोटी असाव ( मूल बाळ ). त्यामुळे दुःख सुसह्य होईल ही अपेक्षा. | 1 |
| 23. | पाय पाहिला त्याने हत्ती खांबासारखा, कान पाहिला त्याने हत्ती सुपासाखा, सोंड पाहिली त्याने हत्ती मुसळासारखा पाठ पाहिली त्याने हत्ती भिंती सारखा, शेपूट पाहिली त्याने हत्ती खराट्या सारखा असे म्हणत स्वतःचेच खरे म्हणाले. | 2 |
| 24. | ट्राम कंडक्टर, बस कंडक्टर, दुकानातील विक्रेत्या, हॉटेल मध्ये वाढपी, लिफ्ट मन, बूट पॉलीश, केसकापणे अशी विविध कामे करत्तात. | 2 |
| 25. | सगळे जेवण गरम होते. दगडाच्या चुलीवरील रटरटलेले घट्ट पिठले, तळलेल्या भोपळीच्या मिरच्या, ज्वारीची पोपडेदार मुलायम भाकरी बेसनाच्या उंडयावर अर्धा प्याला तापवलेले जवसाचे तेल. असा बेत आखला गेला होता. | 2 |
| 26. | आण्णाने दारू सोडावी. रोज कामाला जावे. पैसे मिळवावेत. संसारासाठी वापरावेत. पोराना शिक्षण द्यावे. घर बांधावे. पोराना कपडे घ्यावेत. असे ( आक्काला ) उत्तम कांबळेंच्या आईला वाटे. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 27. | शिष्य आळशी निष्ठूर नसावा. आपल्या कामात तत्पर असावा. गुरुची सेवा करणारा असावा. मनाने उदार असावा. मुक्तोच्या मार्गावर चालणारा असावा. ही चांगल्या शिष्याची लक्षणे होत. | 2 |
| 28. | सौभद्र असे अभिमन्यू ( सुभद्रा व अर्जुन यांचा पुत्र ) याला म्हणतात. | 1 |
| | कारण सुभद्रेच्या पोटी जन्मला म्हणून त्याला सौभद्र म्हणतात. | 1 |
| 29. | **माहेरचे** पाणी गोड लागते. माहरच्या वाटेवर मऊ हिरवाळी दाटलेली असल्या प्रमाणे सुखद वाटते. | 1 |
| | **सासरी** त्रास सहन करावा लागतो. सासर चे दुःख वाटेवरील काटे टोचल्या प्रमाणे वाटते. | 1 |
| III. | पाच-सहा वाक्यात उत्तरे ( उत्तराचे मुद्दे ) : 10 × 3 = 30 | |
| 30. | वसईचा किल्ला 17 मे 1739 रोजी ताब्यात घेतला | 1 |
| | **बालपरवेशी** — लढाईत मरण पावलेल्या सैनिकांच्या मुलांच्या संगोपनासाठी दिलेला बैठा पगार, जमीन इ. | 1 |
| | **नानापरवेशी** — लढाईत मरण पावलेल्या सैनिकाच्या संततीहीन पत्नीस तिच्या निर्वाहापुरता दिलेला पगार, जमीन इ. | 1 |
| 31. | एकजण करतो म्हणून दुसरा करतो असे अनुकरण सर्वजण करतात. त्या गोष्टीचा आपल्याला किती उपयोग आहे, याचा विचार करत नाहीत. त्या गोष्टीपासून इतराना सुख मिळते की नाही याचा विचार करत नाहीत. लोक काय म्हणतील या विचाराने स्वतःला त्रास करून घेतात व मनाविरुद्ध गोष्टी करतात. अशा 90% गोष्टी आपण लोकासाठी करतो. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 32. | **मदर्स युनियन** — या संस्थेची स्थापना 1945 साली. | 1 |
| | हिरोसिमावरील बॉंब हल्ल्यात अनेक घरे उध्वस्त झाली. कुटुंब उध्वस्त झाली. आई बापाविना मुले हिंडू लागली. त्याना आसरा देण्यासाठी स्थापना झाली. | 1 |
| | तीन मजली इमारत. पहिला मजला मदर्स युनियन, दुसरा मजला पालक संस्था, तिसरी मजला शिक्षक संघटना ऑफिस. | 1 |
| 33. | केशव मेश्राम गावात पोहोचले त्यावेळी काळोख झाला होता. कुत्री भुंकत होती. आचळाना झटणाऱ्या वासरांच्या गळ्यातील घुंगराचा ताल बद्ध आवाज येत होता. कडबा खाणाऱ्या बैलांच्या रवंथीचा चमचमाट ऐकू येत होता प्रत्येक गोठ्या जवळून मच्छराचा थवा गुणगुणत होता. कांही कंदिलाच्या वाती मोठ्या झाल्या होत्या. | 3 |
| 34. | जठा राखणे, अंगाला राख (भस्म) फासणे. संसारातून विरक्तपणा दाखवून मठाची उठाठेव करणे. मनात भाव नसताना वरपांगी हरीनाम घेणे गळयात तुळशी, रुद्राक्षाच्या माळा घालणे. शुद्धतेचे आचरण नसणे. जपतपाचे सोंग करणे. होमात तीळ, तांदूळ, तूप जाळून भक्तिहीन होम करणे. दंड कमंडलू घेऊन लटके वागणे. | 3 |
| 35. | **कृष्ण** — युद्धात गोंधळलेल्या अर्जुनाला युद्धास प्रवृत केले. भरकटलेल्या समाजाला हेच कार्य समाज सेवकानी केले. | 1 |
| | **सौभद्र** — अर्जुन अन्यत्र युद्धात गुंतला असताना स्वजनासाठी चक्रव्यूह भेदून प्राण दिला. बलीदान देणारे समाज सेवक. | 1 |
| | **कर्ण** — रथाचे चक्र भूमीत फसले तरी शौर्याने परिस्थितीवर मात. तसे कठीण परिस्थितीत सामना करणारे समाज सेवक. | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 36. | **तारे** — दिमाखात नटून थटून पृथ्वीवर उल्कारूपी फुले टाकतात. | |
| | **चंद्र** — सूर्याचे किरण घेऊन तप करून मोहवायचा प्रयत्न करतो. | 1 |
| | **शुक्र** — पहाटेचा पिसारा फुलवून प्रेमळपणे याचना. | 1 |
| | **मंगळ** — लाजून लाल होऊन प्रेमाची याचना करतो. | |
| | **ध्रुव** — पृथ्वीच्या प्रेमासाठी संन्यस्त होऊन तपाचरण. | 1 |
| | **धुमकेतू** — केस पिंजारून प्रेम याचनेची आर्जवे करतो अशा प्रकारे पृथ्वीकडे प्रेमाची याचना करतात. | |
| 37. | पहाटेच्या वेळी उठून असणारे थोडे धान्य दळते. दिवस थोडा वर आला की कामाला जाते. मुलासाठी तिचा जीव मागे राहतो. ती त्याला पाटीखाली ठेऊन कामाला लागते. उन्हाच्या झळा सोसते. पाय भाजू नयेत म्हणून पायाला पाला बांधते. घोटभर पाण्यासाठी रान धुंडाळते. तिच्या कष्टावर श्रीमंताची चैन चालते. | 3 |
| 38. | **पुरस्कार** — पद्मविभूषण, पद्मभूषण, तानसेन पुरस्कार, केंद्रीय संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार, माणिक रत्न, कर्नाटक भूषण गोदावरी पुरस्कार. | $1\frac{1}{2}$ |
| | उपाध्या — सहा विद्यापीठाकडून डॉक्टरेट, संगीत सरस्वती, संगीत सम्राज्ञी, भारतीय कंठ. | $1\frac{1}{2}$ |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 39. | अनेक व्रते केली. नियम धरले; देव, गुरु, ब्राह्मणांची सतत पूजा केली. दारी आलेल्या याचकाला विन्मुख ( परत ) पाठविले नाही. याचे पुण्य कृष्ण प्राप्ती साठी अर्पण. | $1\frac{1}{2}$ |
| | प्राप्ती न झाल्यास जीभ हासडून जीव देणार आहे. पुढे शंभर जन्म घेऊन उग्र तपस्या करणार आहे. व श्री कृष्णाची प्राप्ती करुन घेणार आहे. | $1\frac{1}{2}$ |
| IV. | आठ-दहा वाक्यात उत्तरे लिहा ( उत्तराचे मुद्दे ) : $5 \times 4 = 20$ | |
| 40. | **बहावा** — लाल आणि चिनार केशरी रंगाची उधळण करतो. पहाडी भागात रंगीबेरंगी कपडे घालून कुठेतरी वरात चालल्या प्रमाणे वाटते. | 1 |
| | **बांबू** — बांबूच्या वनातून वारा वाहताना 'सोंय सोंय' असा येणारा आवाज 'साई' म्हणत असल्या प्रमाणे वाटते. नामशेष होण्याच्या वेळी याळा फुले येतात. | 1 |
| | **पपया** — तीन वेळा फळ दिल्यानंतर हे झाड मरते. | 1 |
| | **चाफा** — कुठलेही पान फांदी तोडली की पांढरा चिक येतो. म्हणून याला 'बडी माँ' म्हणतात. फुले आली की पाने गायब होतात व पाने आली की फुले नसतात. येथे पानाफुलांचा लपंडाव चालतो. | 1 |
| 41. | शाळ्त खिडक्या समोर माणसं राहत. घाण घाण शिव्या देत. ओरडत असत. कुणी छेड काढत. कुणी बाजूने जायचा. कुणी थुंकायचा. आडवे येऊन खाकरत. एकदा तरी चारी बाजूने त्याना अडविले. हे क्षुद्र माजले म्हणून सावित्री बाईना लोक म्हणत. हे महाभयंकर आहे. असे म्हणत. अंगावर घाण टाकत. दगड मारत. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 42. | भारतातील लोक आनंदाने गुण्यागोविंदाने नांदावेत. जात, पंथ, धर्म, संप्रदाय असा भेद नसावा. गरीब - श्रीमंत, उच्च-नीच, हिंदू, मुस्लीम, शीख, इसाई एक दिलाने, एक मताने राहावेत. सर्वांना मानवता धर्म कळावा. सर्व जाती धर्माची एकत्र प्रार्थना व्हावी. येथील तरुण उद्योगी व शीलवान असावा. अस्पृश्यतेचा समूळ नायनाट व्हावा. भीती नष्ट होऊन घराघरात सौंदर्य रमावे. | 4 |
| 43. | मातीत राबणारा शेतकरी अनवाणी राबतो. ऊन, वारा, वीज, पाऊस, याची तमा नसते. आपल्या बैलाच्या मदतीने शेती करतो. त्याची बायको त्याला कामात मदत करते. पोटावर ओटी बांधून पेरणी करु लागते. प्रत्येक काम त्याच्या बरोबरोने करते. आपले तान्हेम्ल ते झाडाला झोळी टांगून त्यात झोपवतात. त्याला मायेचा उबारा कमी मिळतो. पावसाने शेतकरी कुटुंबावर अभिषेक होतो. काटा रूतल्यानंतर शेतात सांडणाऱ्या रक्ताने त्याचे हिरवे सपान ( पिके ) फुलते. | 4 |
| 44. | कवितेच्या ओळी पूर्ण करा —<br>कवच भूमिचे आणि अचानक<br>भेदुनि आले हिरवे कौतुक<br>नचिकेताचे स्वप्नच अथवा अवचित हो साकार<br>पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| | **विभाग - B** | |
| | **( व्याकरणावर आधारित )** | |
| V. | योग्य पर्यायी उत्तरे : ( बरोबर उत्तरास एक मार्क द्या ) : $10 \times 1 = 10$ | |
| 45. | (क) दिक् + मूढ | 1 |
| 46. | (ब) प्रत्यय नाही | 1 |
| 47. | (ब) कर्मणी | 1 |
| 48. | (क) अपूर्ण वर्तमान काळ | 1 |
| 49. | (ड) पवित्र | 1 |
| 50. | (अ) केवल वाक्य | 1 |
| 51. | (क) समाहार द्वंद्व | 1 |
| 52. | (अ) मीनाक्षी | 1 |
| 53. | (ब) क्रिया विशेषण | 1 |
| 54. | (ड) सांडणी | 1 |
| VI. | तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द ( बरोबर उत्तरास एक मार्क द्या ) : $4 \times 1 = 4$ | |
| 55. | निशा, रजनी, रात्र, संध्याकाळ, सायंकाळ | 1 |
| 56. | अपूर्ण विराम / विसर्ग | 1 |
| 57. | बछडा | 1 |
| 58. | कन्नड | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
| --- | --- | --- |
| VII. | सूचने प्रमाणे प्रश्नांची उत्तरे ( मुद्दे ) : $3 \times 2 = 6$ | |
| 59. | **अलंकार** — चेतन गुणोक्ती. | 1 |
| | **व्याख्या ( लक्षण )** — निसर्गातील अचेतन वस्तू चेतन आहेत. त्या माणसा प्रमाणे वागतात. किंवा कृती करतात. असे जेथे वर्णन केलेले असते, तेथे चेतन-गुणोक्ती अलंकार होतो. | 1 |
| 60. | विद्या बंध अस विदेश गमनी विद्या महादेवता<br>- - - \| U U - \| U - U \| U U - \| - - U \| - - U \| -<br>म \| स \| ज \| स \| त \| त \| ग | 1 |
| | वृत्ताचे नाव — शार्दुलविक्रिडित | 1 |
| | अक्षरे — 19 गण — म, स, ज, स, त, त, ग. | |
| | यति — 6, 12, 19 | |
| 61. | वाक्प्रचाराचा अर्थ :<br>अर्थ सांगणे $\frac{1}{2}$ मार्क<br>वाक्यात उपयोग करणे $\frac{1}{2}$ मार्क | |
| | (i) डोक्यावर घेणे - कौतुक करणे, स्तुती करण. | 1 |
| | (ii) कोंडमारा होणे - उघडपणे सांगता न येणे / घुसमट होणे / गुदमरणे. | 1 |
| | ( वाक्यात वाक् प्रचाराचा उपयोग व्हावा अर्थाचा नव्हे. ) | |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | | | गुण |
|---|---|---|---|---|
| | **विभाग - C**<br>**( लेखन व रचनावर आधारित )** | | | |
| VIII. 62. | कल्पना विस्तार ( उत्तराचे मुद्दे ) : | | $1 \times 3 = 3$ | |
| | (i) कल्पनेचा अर्थ सांगणे ( शब्दशः अर्थ ) | 1 | | |
| | (ii) उदाहरण व स्पष्टीकरण | $1\frac{1}{2}$ | | 3 |
| | (iii) तात्पर्य | $\frac{1}{2}$ | | |
| IX. | पत्रलेखन : उत्तराचे मुद्दे : | | $1 \times 5 = 5$ | |
| 63. | (i) प्रेषक पत्ता ( पाठविणाऱ्याचा ) | 1 | | |
| | (ii) मायना | 1 | | |
| | (iii) विषय मांडणी भाषा सजावट | 2 | | 5 |
| | (iv) शेवटो सही | $\frac{1}{2}$ | | |
| | (v) कोणाला पाठवायचे त्याचा पत्ता. | $\frac{1}{2}$ | | |
| X. | निबंध लेखन : ( उत्तराचे मुद्दे ) | | $1 \times 5 = 5$ | |
| 64. | (i) आकर्षक सुरवात | 1 | | |
| | (ii) विषय ज्ञान | 2 | | |
| | (iii) भाषा सजावट ( अलंकार वगैरेचा वापर ) | 1 | | 5 |
| | (iv) शेवट. | 1 | | |